गीत ः दिस चार झाले मन     चित्रपट ः आईशप्पथ

गायिका ः साधना सरगम     गीत ः सौमित्र     संगीत ः अशोक पत्की

दिस चार झाले मन हो

पाखरू होऊन

दिस चार झाले मन

हो पाखरू होऊन

पानं पानं आर्त आणि झाडं बावरून

सांजवेळी जेव्हा येई आठव आठव

दुर कुठे मंदिरात होई घंटारव

उभा अंगभर राही काटा सरसरून

दिस चार झाले मन हो

पाखरू होऊन

नकळत आठवणी जसे विसरले

वाटेवर इथे तसे ठसे उमटले

दुर वेडेपिसे सुर सनई भरून

दिस चार झाले मन

पाखरू होऊन

झाला जरी शिडकावा धुंद पावसाचा

आता जरी आला इथे ऋतु वसंताचा

ऋतु हा सुखाचा इथला गेला ओसरून

दिस चार झाले मन  हो पाखरू होऊन

पानं पानं आर्त आणि झाडं बावरून